अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 21 ऑगस्ट 2025 | वर्ष 11 वे | अंक 01 ला | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरीत नगरसेवकांची संख्या २० वरून २३ वर

### प्रभागांच्या संख्येत १ ने भर, एकुण प्रभाग ११

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषद, नगर पंचायत आणि औद्योगिक नागरी कायदा १९६५ च्या कलमा प्रमाणे सुधारणा केल्यामुळे ब्रम्हपुरी नगर परिषद क्षेत्रातील प्रभाग रचनेत बदल करण्यात आला आहे. पूर्वी १० प्रभागात २० नगरसेवकांची निवड करण्यात येत होती. यावेळी प्रभाग संख्येत ०१ ने भर पडली असून, प्रभागाची संख्या एकुण ११ अशी झाली आहे.

एकुण ११ प्रभागांपैकी १० प्रभागातून प्रत्येकी दोन असे २० नगरसेवक व एका प्रभागातून ०३ नगरसेवक असे एकुण २३ नगरसेवक राहणार आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार ब्रम्हपुरी शहराची लोकसंख्या ३६०२५ इतकी होती. यामध्ये अनुसुचित जातीची लोकसंख्या ७६५९ व अनुसुचित जमातीची लोकसंख्या २२७६ एवढी आहे. दोन सदस्यीय प्रभागात



सरासरी लोकसंख्या ३१३३ व त्रीसदस्यीय प्रभागात सरासरी लोकसंख्या ४६९९ इतकी आहे. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या २०२५च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता दिली आहे. नागरिकांच्या माहितीसाठी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांना दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत हरकती आणि माहिती मुख्याधिकारी यांच्याकडे नोंदवावी लागेल. त्यानंतर जिल्हादंडाधिकारी ०१ ते ११ सप्टेंबर दरम्यान त्यावर सुनावनी घेतील. राज्य निवडणूक आयोग २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान प्रभाग रचनेला अंतिम मान्यता देईल.

नवीन प्रभाग रचनेनुसार विविध राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आपली रणनीती आखण्यास सुरूवात केलेली आहे. तर कुठे 'कहीं खुशी कहीं गम' असे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आहे.

**झाडे लावा, झाडे जगवा...**

## परवानाधारक दारू दुकानातून अवैध दारूची तस्करी!

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

ब्रम्हपुरी तालुक्यात अवैध व्यवसाय राजरोसपणे सुरू आहेत. यात मटका, जुगार, अवैध रेती तस्करी, चोऱ्या, आदींचा समावेश आहे. आता तर तालुक्यात परवानाधारक दारू विक्रेत्यांकडूनच नियमांना तिलांजली देत अवैध दारू विक्री सुरू असल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यातील अनेक खेडेगावात अवैध धंद्यांना उधान आले आहे. अवैध धंद्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी पोलिस विभागाकडून कारवाया केल्या जात असल्या, तरी कारवायांना न जुमानता अवैध व्यवसायीक राजरोसपणे आपले धंदे चालवीत आहेत. त्यात जुगार, मटका, यांच्यासह अवैध दारू विक्री जोमात सुरू आहे. सद्यस्थितीत सरकारमान्य परवानाधारक दारू दुकानातून इतर ठिकाणी अवैधरित्या मद्य पाठविण्यात येत असल्याचे नागरिकांच्या चर्चेवरून समोर आले आहे. गांगलवाडी परिसरात येणाऱ्या हळदा, मुडझा, आवळगाव, गोगाव, तळोधी, वांद्रा, पवनपार आदी. नावाजलेल्या गावात अवैध धंदे व अवैध दारू विक्री जोमात सुरू असल्याचे कळते. सरकारमान्य परवानाधारक दारू दुकानातून इतर ठिकाणी अवैधरित्या मद्य पाठविण्यात हे तस्कर गुणवंत आहेत. सदर गांगलवाडी परिसरात अवैध रित्या मद्य पाठविण्याच्या कामात 'तिजा' नामक इसम कार्यरत असल्याचे सूत्रांकडून तसेच सुजान नागरिकांकडून कळते. सदर माहिती गांगलवाडी परिसरातील नागरिकांनी नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर ब्रम्हपुरी समाचारच्या कार्यालयात येऊन दिली, हे विशेष. तसेच शहरांपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या चौगान, बेटाळा, अऱ्हेर नवरगाव आदी गावातही अवैध दारू विक्रीचा व्यवसाय जोमात सुरू आहे. चौगान गावात पाच अवैध मद्य विक्री करणारे व्यवसायिक असून चौकातच अवैध व्यावसायिकांद्वारे तळीरामांना मद्याची सोय केली जात असल्याचे कळते. अवैध व्यवसायिकांवर कारवाई करण्यासाठी नागरिकांनी पोलिसांकडे तक्रार केली असता, पोलीस प्रशासन दखल होण्याच्या अगोदरच हे अवैध व्यावसायिक आपला मुद्देमाल मोठ्या शिताफिने गायब करतात. हे मात्र विशेष. यावरून अवैध व्यवसायिकांना कारवाईची कोण माहिती देते हे, न उकलणारे कोडे आहे. कितीही करावया केल्या तरी आमचे कुणीही काहीही बिघडवू शकत नाही, अशाच अविर्भावात अवैध दारू विक्रेते व परवानाधारक दारू दुकानातून इतर ठिकाणी अवैधरित्या मद्य पाठविणारे तस्कर वागताना दिसत आहेत.

हा मद्य प्रवास पोलिस विभागाच्या कार्यक्षेत्रातून डोळ्यादेखत सहिसलामत कसा सुटतो याचेच अनेकांना आश्चर्य आहे. शहर व तालुक्यात परवानाधारक देशी दारूचे जाळे पसरलेले आहे. या दुकानांतून पिण्याकरीता नव्हे तर अवैध विक्रीकरीता मद्य विक्री होत असल्याचे बोलले जात आहे. परवानाधारक दारू दुकानांमधुन गाव खेड्यात अवैध व्यवसायिकांकडे पुरवठा केला जातो. अवैध मद्य विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांची माहिती परवानाधारकडे असते. मात्र कधी कधी एखाद्या अवैध मद्य विक्री करणारा गोत्यात आलाच, तर एकतर्फी कारवाईला त्याला समोर जावे लागते. त्यामुळे परवानाधारक मद्य विक्री करणारा व्यावसायिक खरंच आपल्या भूमिकेशी प्रामाणिक आहे काय? परवानाधारक विक्रेत्याकडून अवैध व्यवसायाला प्रोत्साहन देणाऱ्या परवानाधारकांवर कारवाई होणार का? असे एक नव्हे अनेक प्रश्न नागरिकांत उपस्थित होत आहेत. २१ वर्षाखालील मुलांना मद्य देऊ नका असाही एक नियम आहे. पण, या नियमाची पायमल्ली केली जात आहे. आजचे अनेक तरुण व्यसनांच्या आहारी जाऊन भविष्य बरबाद करीत आहेत. पोलिस प्रशासन व जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकाराकडे लक्ष देऊन अवैध दारू विक्रेते व परवानाधारक दारू दुकानातून इतर ठिकाणी अवैधरित्या मद्य पाठविणाऱ्या त्या गुणवंतांवर व त्यांना प्रोत्साहन देणारे व्यावसायिक यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिक करीत आहेत.

❁❁❁❁❁❁❁



## संपादकीय...

# विरोधकांच्या निशाण्यावर निवडणूक आयोग!

केंद्रिय निवडणूक आयोगाच्या मदतीने भाजपने देशभरात निवडणुकांचे घोटाळे केले असून या 'मतचोरां'ना केंद्र आणि बिहारच्या सत्तेतून खाली खेचा, असे आवाहन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह 'महागठबंधन'च्या नेत्यांनी रविवारी केले, काँग्रेसच्या 'व्होटर अधिकार यात्रे'ला सुरुवात करताना सासाराम येथील जाहीर सभेतून विरोधकांनी सत्ताधारी भाजप-संयुक्त जनता दल आघाडी विरोधात रणशिंग फुंकले. एकीकडे केंद्रिय निवडणूक आयोग नवी दिल्लीमध्ये राहुल गांधींनी केलेल्या मतांच्या चोरीच्या आरोपाविरोधात स्पष्टीकरण देत असतानाच, रविवारी विरोधकांनी आयोग व भाजपवर हल्लाबोल केला. सभेला राहुल गांधी यांच्यासह राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव, बिहारचे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव आणि 'महागठबंधन'मधील सर्व घटक पक्षांचे नेते सहभागी झाले.

सभेतून भाजपच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीविरोधात जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. 'बिहारमधून चोरांना हटवा, भाजपला हरवा', असा नारा लालूप्रसाद यांनी दिला. 'बिहारमधील निवडणूक भाजप विरोधात एकजुटीने लढवली पाहिजे. त्यासाठी राहुल आणि तेजस्वी यांच्या पाठीशी उभे राहा. देशातील लोकशाही टिकवण्यासाठी भाजपला सत्तेतून फेकून द्या,' असे आवाहन त्यांनी केले. बिहार निवडणुकीमध्ये काँग्रेसकडून मतचोरी व संविधान बचाओ या दोन मुद्यांना प्रचारात प्राधान्य दिले जाईल, हे राहुल गांधींच्या भाषणातून स्पष्ट झाले. महाराष्ट्र, कर्नाटकमध्ये केंद्रिय निवडणूक आयोगाने मतांची चोरी केली, बनावट मतदारांचा समावेश केला गेला. या नव्या मतदारांच्या मदतीने भाजपने जागा जिंकल्या, असा आरोप राहुल गांधींनी केला. बिहारमध्ये निवडणूक आयोग मतदारांची फेरतपासणी करून विधानसभा निवडणुकीची चोरी करत असल्याची टीका त्यांनी केली. बिहारची निवडणूक ही संविधान बचावासाठी होणारी लढाई आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजप संविधान नष्ट करत आहेत. असा आरोप गांधींनी केला. तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला, 'पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून संघाचे कौतुक केले. संघ जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संस्था असल्याचे मोदी म्हणाले. जे ब्रिटिशांकडे नोकरी मागत होते, ज्यांनी कधी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला नाही, त्यांचे कौतुक केले जात आहे. संघ, मोदी हे देशासाठी अत्यंत धोकादायक आहेत, त्यांना सत्तेवरून खाली खेचा,' अशा शब्दात खरगेंनी प्रहार केला. तेजस्वी यादव यांनीही भाजपवर टीका करताना केंद्रिय निवडणूक आयोग मतांची चोरी नव्हे तर मतांचा दरोडा टाकत आहे, असा आरोप केला. मताचा अधिकार हा मागास, गोरगरिबांचे अधिकार असून तो हिरावून घेतला जात आहे. लोकशाही संपवण्याचा घाट घातला जात असून महागठबंधन हे होऊ देणार नाही, ही ताकद फक्त बिहारमध्ये आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसची ही 'व्होटर अधिकार यात्रा' १६ दिवस चालणार असून २३ जिल्ह्यांतील ५० हून अधिक विधानसभा मतदारसंघांतून ती प्रवास करेल.

दुसरीकडे निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत मतचोरीचा कट रचल्याच्या विरोधकांच्या आरोपांचे खंडन केले. काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांवर सात दिवसांच्या आत शपथपत्र सादर करावे, अन्यथा मतचोरीचे दावे निराधार व अवैध ठरवले जातील, असे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्पष्ट केले. निवडणूक आयोग राजकीय पक्षांमध्ये भेदभाव करू शकत नाही आणि मतदान अधिकाऱ्यांसमोर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष दोन्ही समान आहेत, असेही त्यांनी सांगितले. मतचोरीचा आरोप आणि भारतीय राज्यघटनेचा अपमान असून निराधार आरोप करणाऱ्यांना देशाची माफी मागावी लागेल, असे मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले.

# ने.हि. महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनी विविध कार्यक्रम




ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.सर्वप्रथम प्राचार्यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. त्यानंतर राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत घेण्यात आले. भारतीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांनी ध्वजाला मानवंदना देऊन देखणे शिस्तबध्द प्रदर्शन केले.

यावेळी शांताबाई महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वरभे सर, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. कुलजित शर्मा, प्रा. अभिजात परकरवार, मेजर विनोद नरड, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, अधीक्षक संगीता ठाकरे, प्रा. बोरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी भारतीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांना विशेष बक्षिसं यावेळी देण्यात आले.

या विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी डॉ. धनराज खानोरकर, डॉ. असलम शेख, डॉ. मोहन कापगते, डॉ. किशोर नाकतोडे, डॉ. रतन मेश्राम, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. योगेश ठावरी, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. हर्षा कानफाडे, डॉ. अरविंद मुंगोले, डॉ. मिलिंद पठाडे, डॉ. दर्शना उराडे, डॉ. आशिष साखरकर, डॉ. मोहूर्ले, प्रा. खोब्रागडे, प्रा. लेनगुरे मॅडम, रोशन डांगे, सुषमा राऊत, दत्तू भागडकर, प्रज्ञा मेश्राम, आलोक मेश्राम इत्यादी मान्यवरांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे संचालन संजू मेश्राम यांनी तर आभार प्रदर्शन अभिजित परकरावारांनी केले. यशस्वीतेसाठी जगदिश गुरनुले, विजू, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

# जिजाऊ ब्रिगेडतर्फे श्रावण महोत्सव उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिजाऊ ब्रिगेड ब्रह्मपुरीच्या वतीने श्रावण महोत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक ढंगात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी वृक्षारोपण करण्यात आले तसेच एकमेकांना झाडांची भेट देत पर्यावरण जपण्याचा सुंदर संदेशही देण्यात आला.



कार्यक्रमात सर्व महिलांनी पारंपरिक गाणी, खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा मनमुराद आनंद घेतला. उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे महिलांच्या उत्स्फूर्त सहभागातून साकारलेला एकतेचा आणि पर्यावरण प्रेमाचा संदेश होता. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन जिजाऊ ब्रिगेडच्या कार्याध्यक्ष प्रमिलाताई राऊत यांनी केले. त्यांच्यासोबत सहसचिव पूनमताई नाकतोडे, अध्यक्ष कल्पनाताई तिवाडे, उपाध्यक्ष शुभांगी बेले, सचिव पिंकी राऊत यांनी आयोजनात मोलाचा सहभाग दिला.

कार्यक्रमात ब्रिगेडच्या इतर सदस्यांमध्ये मीनाक्षी सोनकुसरे, विशाखा धुर्वे, विद्याताई ढोरे, योगिता ठाकरे, पूर्णिमा पारधी, सुप्रिया तलमले, मनीषा तलमले, ईशा पिलारे, श्वेता पिलारे, ठेंगरीताई, गायत्री पिलारे यांची उपस्थिती आणि सहकार्य उल्लेखनीय होते.

# कृषी व अर्थराज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांची प्रा. देशकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्याचे कृषी व अर्थ राज्यमंत्री शिवसेनेचे नेते नाम. ॲड. आशिषजी जयस्वाल गडचिरोली जिल्हाच्या दौऱ्यावर असतांना त्यांनी ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी. आम. प्रा. अतुल देशकर यांची त्यांच्या निवासस्थानी धावती सदिच्छा भेट घेतली.

त्यांनी २००४ ते २०१४ या दरम्यान राज्याच्या विधिमंडळात सोबत कामकाज केले आहे. वेगवेगळ्या पक्षाचे असतांना देखील दोघांमध्ये मैत्री आजही कायम आहे. भेटी दरम्यान जुन्या आठवणीना उजाळा दिला. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली. ब्रह्मपुरी विधानसभेच्या विकासासाठी पूर्ण सहकार्य करणार असल्याची खात्री त्यांनी याप्रसंगी दिली. या भेटी दरम्यान भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विनोदिनी

एक पहलवान होटल में गया था... थोडा रिलॅक्स होने के लिए उसने अपना कोट बाजू के हँगर पर टांगा, तथा चोरी न हो जाए इस डर से उस पर एक पर्ची भी लगा दी कि कृपया कोट न चुराएं... कोट का मालिक मुक्केबाजी में विश्व-चैंपियन...

जब खाना खाने के बाद लौटे तो देखा...

कोट गायब था...

.बाजू में ही एक और दूसरी पर्ची वहां रखी थी... और लिखा था...

कृपया पीछा न करें... कोट लेने वाला दौड़ में विश्व-चैंपियन .....!!!!

# अखिल कुणबी समाज मंडळाद्वारे विद्यार्थी मार्गदर्शन व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

ब्रह्मपुरी/का.प्र.

अखिल कुणबी समाज मंडळ, ब्रह्मपुरी यांच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन हा दुहेरी हेतू डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थी मार्गदर्शन व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा १७ ऑगस्ट ला स्वागत मंगल कार्यालयात अत्यंत उत्साह, प्रेरणा व समाजभावनेच्या वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात समाजातील शंभराहून अधिक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अखिल कुणबी समाज मंडळ ब्रह्मपुरीचे माजी प्राचार्य देविदासजी जगनाडे होते. तर उद्घाटन दामोधर मिसार संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चंद्रपूर यांनी, कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले उपस्थित होते. या सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले ते म्हणजे दिल्लीतील आयएएस अकॅडमीचे मार्गदर्शक प्रा. प्रशांत भाग्यवंत यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी UPSC व MPSC या देशातील सर्वोच्च स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना दिशा दाखवली. 'यश केवळ बुद्धिमत्तेने मिळत नाही, त्यामागे अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी, योग्य नियोजन आणि सततची शिस्त असते. UPSC-MPSC ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी वर्ग आठवीपासूनच नियोजन सुरू करणे आवश्यक आहे. लहान वयात अभ्यासाची सवय व पद्धत लावून घेतल्यास पुढील काळातील कष्ट हलके होतात आणि यशाचे शिखर गाठणे सोपे होते.' हा अत्यंत मोलाचा संदेश त्यांनी दिला.

प्रशांत सरांच्या विचारांनी उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह, आत्मविश्वास आणि यशासाठीची प्रखर जिद्द जागृत झाली. या मार्गदर्शनामुळे कुणबी समाजातील युवक-युवती मोठ्या प्रमाणावर स्पर्धा परीक्षांकडे वळतील व समाजाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रमोद चिमूरकर, कृष्णालाल सहारे, प्रमोद तोंडरे, प्रा.प्रकाश बगमारे, प्रा.डॉ.राकेश तलमले, डॉ. सतीश दोनाडकर, डॉ. पंकज लडके, डॉ. भुयार, नानाजी तुपट, फाल्गुन राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मुनिराज कुथे व ओमप्रकाश बगमारे तर आभार प्रदर्शन रामकृष्ण चौधरी यांनी केले.

# रोहित वझाडे तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात प्रथम




देसाईगंज/प्रतिनिधी

तालुकास्तरीय अखिल भारतीय विज्ञान विद्यार्थी मेळावा २०२५ नुकतेच डॉ. परमपूज्य बाबासाहेब आंबेडकर विद्यालय देसाईगंज येथे घेण्यात आला. यात देसाईगंज तालुक्यातील तुळशी येथिल शिवाजी विद्यालयाचा विद्यार्थी रोहीत देविदास वझाडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर जिल्हा परिषद हायस्कूल कुरुड येथिल विद्यार्थी कार्तिक बळीराम वरंबे याने द्वितीय क्रमांक मिळविला.त्यामुळे यांना विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यात सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

देसाईगंज येथिल आयोजित मेळाव्याचे उद्घाटन डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक सत्यवान धोंगडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी यशवंत टेंभुर्णे पं.स.देसाईगंज हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून गटसमन्वयक एकनाथ पिलारे, केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर बांडे, विषय साधन व्यक्ती अरविंद घुटके उपस्थित होते.

क्वांटम ( Quantum ) युगाची सुरुवात : संभाव्यता व आव्हाने हा या विज्ञान मेळाव्याचा सादरीकरणाचा विषय होता. यात तालुक्यातील एकूण दहा शाळांनी सहभाग घेतला होता. वैज्ञानिक माहिती, नाविण्यपूर्ण दृकसाहित्य वापर, भाषणाचा ओघ, प्रश्नांची उत्तरे देण्याची क्षमता, लेखी आशय क्षमता चाचणी, भाषणानंतर तोंडी प्रश्नांच्या उत्तरे या निकषाच्या आधारे सादरीकरणाचे परिक्षकांमार्फत मूल्यमापन करण्यात आले.परिक्षक म्हणून श्रीमती प्रा.डॉ.ए.बी.कनौजिया, प्रा.आकाश डांगे, तसेच सी.एन.बांबोळेयांनी काम पाहीले.

कार्यक्रमाचे संचालन विज्ञान शिक्षिका कु.फुलझेले यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विषय साधन व्यक्ति कु.रानु ठाकूर व शाळेचे सर्व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# तलावात बुडून इसमाचा मृत्यू

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील अर्हेरनवरगाव येथील अरुण तुळशीराम ठेंगरे( ५३ )हा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना दि.१५ ऑगष्ट ला उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार सदर व्यक्ती हा दि.१४ ऑगष्ट ला सकाळी ४ वाजताच्या सुमारास नेहमीप्रमाणे शौचास गावाबाहेरील तलावाच्या पाळीवर गेला होता. मात्र दिवसभर घरी न आल्याने जिकडे तिकडे शोधाशोध घेण्यात आली. मात्र अरुण चा शोध लागला नाही. दि.१५ ऑगस्ट ला सकाळी ६.३० च्या सुमारास गावाजवळील तलावात त्याचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने गावात एकाच खळबळ माजली.

ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे अर्हेरनवरगाव बिट जमादार अरुण पिसे यांनी आपल्या टीम सह सदर मृतदेह ताब्यात घेतले व पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी येथे पाठविण्यात आले. मृतक अरुण हा घरचा कर्ता व्यक्ती असल्याने ठेंगरे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे त्याच्या पश्चात पत्नी व मुले आहे.

# शेतातील मोटारपंप चोरट्यांना अटक

ब्रह्मपुरी/का.प्र.

विहिरीत पाणी काढण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मोटारपंपाची चोरी करणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली. आरोपींकडून ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

काही दिवसांपूर्वी शेतातील सबमर्सिबल मोटार पंप, सोलर सबमर्सिबल मोटर पंप, ३५ फुट मोटार पंपासाठी वापरण्यात आलेला केबल असा एकूण ४४ हजारांचा मुद्देमाल चोरांनी चोरून नेल्याच्या तक्रारी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आल्या होत्या. चोरांचा पोलिस शोध घेत असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रणजीत खुशाल मेंढे (रा. उदापूर) आणि एका विधि संघर्ष बालकाला संशयावरून ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई ठाणेदार बानबले यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक मनोज खडसे, मुकेश गजबे, योगेश शिवणकर, अजय कटाईत आदींनी केली.

# ब्रम्हपुरीत जेष्ठ सुतार कारागिरांचा सत्कार



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मनगरी बहुउद्देशीय सामाजिक संस्था व सुरभी प्लायवूड ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट २०२५ ला स्थानिक जेष्ठ सुतार कारागिरांचा शाल, श्रीफळ व संस्थेचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्याम करंबे, सचिव तुळशीरामजी आंबोरकर, महेंद्रजी कसारे, तवर, यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी जेष्ठ कारागीर वामनरावजी खलोडे, मधुकरराव खेत्रे यांचा सत्कार करण्यात आला. सुतार कारागीर हा समाजातील महत्वाचा घटक असून दैनंदिन जीवनात त्यांचे कार्य अत्यावश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा सत्कार करून त्यांचा मानसन्मान राखावा हा सदर कार्यक्रमाचा उद्देश आहे असे संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्याम करंबे यांनी मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमाला टिकराम गोंगल, तुळशीदास कायरकर, वैभव खलोदे, केवळराम पिंपळकर, धीरज खेत्रे, किशोर देवढगले, देवा पडोले, पुरुषोत्तम रासेकर, मनिष मेश्राम, शरद खलोडे, यांचेसह बहुसंख्येने सुतार कारागीर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रिष्णा ट्रेडिंग कंपनीच्या संयोजिका नंदाताई आंबोरकर, सुरभी प्लायवूडचे कर्मचारी गजानन उराडे, किशोर देवढगले, राजू नखाते यांचे सहकार्य लाभले.

# एलएमबी स्कुलमध्ये जन्माष्टमी उत्सव सोहळा





ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दि १६ ऑगस्टला श्रावण महिण्यातील कृष्ण अष्टमीला मध्यरात्री रोहीणी नक्षत्रावर भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला. तो दिवस म्हणून श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी ने.भै.हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांच्या सह मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या प्रसंगी पाहूण्याचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा शुभारंभ मनमोहक व भक्तीमय वातावरणात केजी-२ च्या विद्यार्थ्यांनी 'मैया यशोदा...' या गाण्यावर राधा कुष्णाची वेशभुषा करून नृत्य सादर करून पाहूण्याचे स्वागत केले. त्यानंतर वर्ग ७ व ८ च्या विद्यार्थ्यांनी 'मथुरेच्या बाजारी...' या गाण्यावर नृत्य सादर केले. तर ९ वी च्या विद्यार्थ्यांनी 'सैया तु जो...' या गाण्यावर नृत्य सादर करून वातावरणात मंत्रमुग्ध केले. तर इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांनी पालखी व्दारे कृष्णाचे आगमन सादर केले. कृष्णाच्या गाण्याच्या तालावर दही-हंडी फोडून धमाकेदार श्रीकृष्ण जन्माष्टमी या कार्यक्रमाची सांगता केली. तसेच प्रि-स्कुलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुद्धा राधा-कृष्णाचा वेश परिधान करून दही-हंडीचा सोहळा व श्रीकृष्ण जन्माष्टमीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वर्ग ७ वी च्या लावण्या लाडे आणि पूर्वी अलबनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन वर्ग ७ वीचा चैतन्य अलोने याने केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# पीआरडी स्पोर्ट्सच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेकरीता निवड

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र अथलेटिक्स असोसिएशन व चंद्रपूर जिल्हा अथलेटिक्स असोसिएशनच्या



मान्यतेने दिनांक १७/८/२०२५ रविवारला जिल्हा क्रीडा स्टेडियम चंद्रपूर येथे राज्यस्तरीय ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी चंद्रपूर जिल्हा संघाची निवड करण्यात आली. यामध्ये पी.आर.डी. स्पोर्ट्स, ब्रह्मपुरी च्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

यामध्ये १६ वर्षातील मुलींच्या गटात कु. समीक्षा हिरालाल राऊत हिने ८० मीटर हर्डल्स रनिंग स्पर्धेत प्रथम व लांबउडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविले तर कु. वैष्णवी नंदूजी मुळनकर हिने गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. १६ वर्षातील मुलींच्या गटात कु. यशोदा अजय खुळशिंगे हीने भालाफेक स्पर्धेत प्रथम व गोळाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावीला तसेच १४ वर्षा आतील मुलांच्या गटात विहान विलास भोयर याने ट्रायथलॉन बी ज्यामधे ( ६० मीटर स्प्रिंटींग रनिंग, लांबउडी , गोळाफेक) या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. १४ वर्षातील मुलींच्या गटात कु. गोजिरी हेमकृष्ण दोनाडकर हिने ट्रायथलॉन बी ज्यामध्ये ( ६० मीटर स्प्रिंटींग रनिंग, लांबउडी , गोळाफेक) स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला तर १४ वर्षातील मुलींच्या गटात कु. वृषाली योगीराज सहारे हीने ट्रायथलॉन बी ज्यामध्ये ( ६० मीटर स्प्रिंटींग रनिंग, लांबउडी , गोळाफेक) या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. १४ वर्षातील मुलींच्या गटात कु. मानसी शेखर फटिंग हिने ट्रायथलॉन सी ज्यामध्ये ( ६० मीटर स्प्रिंटींग रनिंग, लांबउडी , ६०० मीटर) उत्कृष्ट प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांनी ६ गोल्ड, ३ सिल्वर मेडल मिळवत ब्रह्मपुरी शहराचं नाव लौकिक केलं याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# शेकडो भाजप कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरात सुरू असलेल्या विधीमंडळ काँग्रेस गटनेते आ.विजय वडेट्टीवार



यांच्या विकासाचा झंझावात बघुन काँग्रेस पक्षाच्या विचार सरणीला प्रेरित होऊन ब्रम्हपुरी शहरातील विविध भागातील भाजपा व अन्य पक्षांच्या कार्यकत्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशाने आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर भाजपला ब्रम्हपूरीत मोठी खिंडार पडली आहे.

गेल्या १० वर्षापासून विधीमंडळ काँग्रेस गटनेते तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपूरी शहराच्या विकाससाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून कोट्यावधींचा विकास निधी खेचून आणला आहे. तद्वतच संपुर्ण क्षेत्रांतील सर्व समाजाला समान न्याय, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, अनेक सामजिक कार्य यांसह अत्यावश्यक मूलभूत गरजा पुर्ण करुन नागरिकांच्या अडचणी दूर केल्या आहेत. शहरात मोठ्या डौलाने उभ्या असलेल्या विविध शासकीय कार्यालयांच्या नव्या प्रशस्त इमारती, जलतरण तलाव हे त्यांनी केलेल्या विकासकार्याची साक्ष देत आहेत. त्यामुळे अशा विविध कार्यांना प्रेरित होऊन शहरातील भाजप पक्षाचे कार्यकर्ते, सेवानिवृत्त शिक्षक, युवक व महीला यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

सदर पक्षप्रवेश शहर काँग्रेस सचिव पुष्पाकर बांगरे, जिल्हा काँग्रेस सहसचिव मोहम्मद गाजी पटेल यांच्या नेतृत्वाखाली पार पडला आहे. पक्ष प्रवेश करणाऱ्यांमध्ये इकबाल जेसानी, दिपक खंडाईत, फारूक बकाली, आकाश राऊत, जाफर पटेल, मोनू कुरेशी, विराबद्र कोट्टावार, शाकीर पटेल, कुसन उईके, जयकुमार सहारे, लंकेश मेश्राम, प्रमोद सोंडवले, जाहिद पठाण, निखिल सहारे, हेमंत मस्के, राजू खापरे, वैभव करंडे, प्रा.भाऊराव बांगरे, एकनाथ ढोमणे, रमेश रोकडे, अनिकेत बांगरे, हरिश्चंद्र कुर्वे, राजेश्वर मिसार, नामदेव टेंभुर्णे, भिमराव बोरकर, चुडामन पडोळे, डोमेश्वर रेहपाडे, अनिल वडसारिया, लंकेश मेश्राम, प्रमोद सोंडवले, तुळशिराम बांगरे, जमशेद अली, वसंत नक्षिणे, श्रीराम कावळे, रमेश खंडाईत यांसह अन्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

## - निधन वार्ता -

## इंदूताई निनावे

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील विद्यानगर वार्डातील इंदूताई जयराम निनावे यांचे बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५ ला पहाटे ४.०० वा. वृध्दपकाळाने वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्या ने.हि. महाविद्यालय ग्रंथालयातील कर्मचारी खेमराज निनावेच्या आई होत.

येथील भूतीनाला स्मृशानभूमीत त्यांच्यावर गुरवारला दुपारी १.००वा. अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, ०३ मुलं, सूना, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# वंचित स्वबळावर लढणार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

ब्रम्हपुरी/का.प्र.

वंचित बहुजन आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार वंचित बहुजन आघाडी ब्रम्हपुरी विधानसभेची महत्वपुर्ण आढावा बैठक शासकीय विश्रामगृह ब्रम्हपुरी येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये पक्षाची ध्येयधोरणे व निवडणुका संदर्भातील अनेक विषयांवर सकारात्मक चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्धार करण्यात आला.

या बैठकीदरम्यान प्रमुख मार्गदर्शक म्हणुन विदर्भ समन्वयक भगवान भोंडे, विदर्भ [illegible] हाडके,जिल्हाध्यक्षा म. आघाडी कविताताई गौरकार, जेष्ठ कार्यकर्ते डॉ. प्रेमलाल मेश्राम, युवा जिल्हाध्यक्ष शुभम मंडपे, जिल्हा महासचिव म. आघाडी अल्का मोटघरे, लिनाताई रामटेके, अश्विन मेश्राम, बाळासाहेब बन्सोड उपस्थित होते. या आढावा बैठकीचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष लिलाधर वंजारी यांनी केले व संचालन नरेंद्र मेश्राम यांनी तर उपस्थितांचे आभार अनिल कांबळे यांनी मानले. यावेळी पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते म्हणुन डी एम रामटेके, रतन लांडगे, मिलिंद घोरमोडे, सुकेशनी बन्सोड, शारदा घोरमोडे तथा शेकडो महिला, पुरुष, युवक कार्यकर्ते उपस्थित होते.

# क्वांटम युगात अर्पिताची झेप, जिल्हा पातळीवर निवड




नागभीड/प्रतिनिधी

पंचायत समिती नागभिड यांच्या वतीने तालुका स्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२५ चे आयोजन कर्मवीर विद्यालय, नागभिड येथे दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले. या वर्षीचा मेळाव्याचा विषय होता 'क्वांटम युगाची सुरुवात: संभाव्यता आणि आव्हाने'.

या स्पर्धेत नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगाव पांडव येथील इयत्ता ९ वीची विद्यार्थिनी अर्पिता अमोल गेडाम हिने उत्कृष्ट सादरीकरण करीत प्रथम क्रमांक पटकावला. यासाठी तिला शाळेतील विज्ञान शिक्षक आर. जी. फटाले यांचे मार्गदर्शन लाभले. तिची यशस्वी कामगिरी पाहून जिल्हा पातळीवरील विज्ञान मेळाव्यासाठी तिची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील ८ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षणाधिकारी, शालेय शिक्षकवर्ग तसेच मान्यवर उपस्थित होते.

अर्पिताच्या यशाबद्दल तिचे पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेतीच्या वादावरून सख्ख्या भावावर कुऱ्हाडीने वार



ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील मेंडकी गावात शेतजमिनीच्या वादातून सख्ख्या मोठ्या भावाने लहान भावावर कुऱ्हाडीने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. या घटनेत मुकुंदा मारुती जंगठे (५८) हे जखमी झाले आहेत. आनंद मारुती जंगठे (वय ६०) असे हल्ला करणाऱ्या भावाचे नाव आहे.

शनिवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास मुकुंदा जंगठे हे आपल्या घराच्या पोर्चमध्ये बसले होते. त्याचवेळी त्यांचा मोठा भाऊ आनंदराव जंगठे तिथे आला आणि घर

व शेतजमिनीवरून वाद घालत शिवीगाळ करू लागला. यावेळी पाहता पाहता त्याने हातातील कुऱ्हाड उगारत थेट लहान भावावर प्रहार केला. या हल्ल्यात मुकुंदा जेंगठे गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी आनंदराव जंगठे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# ने.हि. महाविद्यालयात ग्रंथालय दिन उत्साहात साजरा

ब्रह्मपुरी/का.प्र.

ने. हि. महाविद्यालयात ब्रम्हपुरी येथील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागातर्फे




ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांची १३३ वी जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी उपस्थित कार्य.प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकरांनी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैयांनी महाविद्यालयात केलेल्या आधुनिक,अद्यावत व सुसज्ज ग्रंथालयात केलेल्या उपलब्ध सोयीचा उल्लेख करुन कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी आधुनिक सोयीसुविधा युक्त असे ग्रंथालय आणि वाचनकक्षाची निर्मिती करून दिलेली आहे, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे सूचविले. यावेळी ग्रंथालय समिती अध्यक्ष डॉ.युवराज मेश्राम, डॉ.रेखा मेश्राम वाणिज्य विभाग प्रमुख, कनिष्ठ महाविद्यालायाचे पर्यवेक्षक प्रा.आनंद भोयर, प्रभारी ग्रंथपाल कु. सुषमा राऊत व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. युवराज मेश्रामांनी केले. सूत्रसंचालन विनय भागडकर तर उपस्थितांचे आभार खेमराज निनावेंनी मानले. प्रा. वैभव बोडखे, प्रा. जगदिश गुरनुले, प्रा.खोब्रागडे, प्रा.परकारवर, प्रा मिसार, प्रा.मेंगरे, प्रा.बोरकर, माणिक दुपारे, सौरभ जैस्वाल, जितू मंडपे आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# रिफॉर्म ऑर्गनायझेशनच्या वतीने वृक्षारोपण व नोटबुक वितरण

ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, रिफॉर्म ऑर्गनायझेशन ब्रह्मपुरी व जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ब्रह्मपुरी येथे १५ ऑगस्ट स्वतंत्र दिनाचे निमित्ताने शाळेतील पटांगणात पाहुण्याच्या शुभहस्ते वृक्ष रोपण करण्यात येऊन पाहुण्याचा हस्ते शालेय विद्यार्थ्यांना नोटबुक व लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना बिस्किट खाऊचे वाटप केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शालेय पटांगणात सामूहिक वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ४ चे मुख्याध्यापक रामकृष्ण चौधरी, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग तालुका अध्यक्ष संतोष सोनटक्के, सल्लागार अ‍ॅड. हेमंत उरकुडे, सहाय्यक शिक्षक टीकेश्वर शिवणकर, सहा.शिक्षिका स्मिता वलावा व भरती करकाडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पगाडे, समितीचे सदस्य अरविंद वानखेडे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हास्तरावर सर्वाधिक मोतिबिंदू शस्त्रक्रिया केल्याबद्दल डॉ. रामटेके सन्मानित



ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांमध्ये वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्ह्यात सर्वाधिक मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे उद्दिष्टे साध्य केल्याबद्दल नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ.यादव रामटेके उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी यांचे स्वातंत्र्य दिन समारोह प्रसंगी जिल्हा मुख्यालय चंद्रपूर येथे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे यांचे हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

. याप्रसंगी डॉ.भास्कर सोनारकर अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ.आडे जिल्हा नेत्र शल्यचिकित्सक, डॉ.किलनाके निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर हे प्रामुख्याने उपस्थित होते. नेत्रचिकित्सा अधिकारी डॉ.यादव रामटेके यांनी उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथील नेत्र विभागातील अतिरिक्त कार्यभार सांभाळून व ब्रम्हपुरी तालुक्यातील इतर सहा प्राथमिक आरोग्य केंद्रात नियमितपणे नेत्र रुग्णांना नेत्र चिकित्सा सेवा देऊन वरील उद्दिष्टे साध्य केले आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेत मान्यवरांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये
जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

**... QUOTES ...**

**"Prepare for the unknown by studing how others in the past have coped with the unforeseeable and the unpredictable."**

**- George S. Patton**

**चारोळी**

तुझ्या डोळयांना कमळ म्हटले तर
तु घड्याळ पाहतेस...
पंजा हलवत सायकलने निघून जातेस,
पक्की राजकारणी आहेस...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्य विविध कार्यक्रम








ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कूल मध्ये ७९ वा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या दिवशी आपल्या देशाला ७९ वर्ष पूर्ण झाल्यामूळे हा स्वातंत्र्य दिन विशेष होता. त्याचप्रमाणे हर घर तिरंगा या उपक्रमाअंतर्गत शाळेमध्ये दि १३, १४ व १५ ऑगष्ट या तिनही दिवशी झेंडावंदन करण्यात आले.

१५ ऑगष्ट हा देशाच्या अभिमानाचा आणि सौभाग्याचा दिवस आहे. स्वातंत्र्य दिन म्हणजे आपल्या हृदयात नवीन उर्जा, नवी आशा, उत्साह आणि देशभक्तीचा संचार असतो. स्कूलमध्ये ध्वजारोहणाचा कार्यक्रम अतिशय आनंदमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांचेसह सुनिता भैया मॅडम, शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम उपस्थित होत्या. त्याचबरोबर माजी नगरसेवक तथा ने.हि. शिक्षण संस्थेचे सदस्य गौरव भैया सर, कोषाध्यक्ष अ‍ॅड. भास्कर उराडे सर, अजय भट्टड सर, दुर्गादास मोहता सर, रमेश छाबडा सर, डॉ. आखाडे व सौ. आखाडे आणि डॉ. राखडे व राखडे मॅडम व डॉ. बनवाडे सर उपस्थित होते.

हा सोहळा संगीत व नृत्य सादरीकरणाने देखील जास्त सुशोभित झाला. यावेळी मूलांनी 'संदेशे आते है' व 'सारे जहाँ से अच्छा' ही गीते सादर केली. तसेच काही विद्यार्थ्यांनी 'आय लव माय इंडिया', 'वंदे मातरम' या गाण्यावर नृत्य सादर केली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने १० वी व १२ वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी काही विद्यार्थ्यांनी 'जय हो' ह्या गाण्यावर स्केटींग करत नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. स्कूलच्या बालगोपालांनी देशप्रेम जागवणारे सुंदर अशी चित्रे चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून काढली. या विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट चित्र, यांची विशेष सजावट मंचाजवळ करण्यात आली. विद्यार्थ्यांनी चित्र, गायन, नृत्य करून देशभक्तीला उजाळा दिला. अशाप्रकारे भारताचा स्वातंत्र्यदिन उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चीराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.





# श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांचा ७५० वा जयंती उत्सव उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती उत्सवाची पालखी तालुक्यातील ग्रामपंचायत खेडमक्ता इथून काढण्यात आली. यावेळेस ग्रामविकास अधिकारी रामकृष्णजी कांबळी, किशोरजी लाडे, सचिनजी वाढाई यांनी आपल्या खांद्यावर पालखी धरून ग्रामपंचायत पासून गावातून सामूहिक मिरवणूक काढण्यात येऊन शिव मंदिर पर्यंत वाजत गाजत पोहोचविण्यात आली.

यावेळेस उपस्थित सरपंच दिशाताई भजनकार, ग्रामपंचायत सर्व सदस्य गण, प्रतिष्ठित मंडळी, महिला पुरुष, गावातील भजन मंडळी आणि जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी पालखीसोबत उपस्थित होते.

❁❁❁❁❁❁❁

# आम. विजय वडेट्टीवार यांना मातृशोक



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते, विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते आम. विजय वडेट्टीवार यांच्या मातोश्री कमलाबाई नामदेवराव वडेट्टीवार यांचे सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ९ वाजून १२ मिनिटांनी त्यांच्या राहत्या घरी कमलाई निवास रामदास पेठ, नागपूर येथे निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले आणि एक मुलगी ही अपत्य आहेत. त्यांच्यावर नागपूर, मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार पार पडले.

# लोकमान्य टिळक विद्यालयाच्या वेदान्त कामडीचे जिल्हास्तरीय रनिंग स्पर्धेत सुयश




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील लोकमान्य टिळक विद्यालयाचा विद्यार्थी वेदांत रवींद्र कामडी याने ऐथलेटिक चॉम्पियनशिप असोसिएशन, चंद्रपूर येथील स्पर्धेत ४०० मीटर रनिंग स्पर्धेत गोल्ड मेडल मिळविले आहे. त्याला रोहित बरडे हे मार्गदर्शन करीत आहेत.

त्याच्या यशासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा. अतुल देशकर सर , सचिव सतीशजी शिनखेडे सर, प्राचार्य धोंगडे सर, उपप्राचार्य पेशट्टीवार सर, पर्यवेक्षिका चिंचाळकर मॅडम व सर्व शिक्षक बंधू भगिनी व कर्मचारी यांनी वेदान्तचे व त्याच्या मार्गदर्शकाचे अभिनंदन केले आहे.

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404